# आरती सद्गुरूरायाची

Aarti Sadgururayachi — Aarti of Shri Vasudevanand Saraswati (Tembe Swami) · Shri Vasudevanand Saraswati

> आरती सद्गुरूरायाची ।
> करिता सद्भावे साची ॥धृ॥

तनमन अर्पूनी या गुरूला ।
प्रेमे ओवाळू त्याला ।
पंचप्राणांच्या वाती ।
लावूनी नेत्रांच्या पाती ।
मन हे स्थिर करुनि पहा ।
रेवा तिरी सद्गुरू हा ॥

---

## चाल

दुसरा देव नसे ऐसा ।
भक्तजनांच्या पुरवुनी आशा ।
सोडूनि जाती संस्कृती पाशा ।
धरू हो कास आम्ही त्याची ।
असे ही कामधेनु आमुची ॥१॥

ध्यान हे रम्य किती दिसते ।

धरी हो हाती दंडा ते ।

भाळी भस्माच्या रेषा ।

शोभती तीन पहा कैशा ।

कटी पदी पर तो झळकतसे ।

कौपिन रम्य किती भासे ।

कमंडलू तो वंशाचा ।

हाती शोभतसे साचा ॥

---

## चाल

विधीहरिहर हे त्रयमूर्ती ।

दत्तची ऐसे, मजला भासे, मन्मनिच वसे ।

मूर्ती मनहरणी साची ।

असे ही कामधेनू आमुची ॥२ ॥

दयाळू कितीतरी मी सांगू ।

वाणी होत असे पंगू ।

केवळ ज्ञानाचा भानू ।

तियेचे गुण किती वर्णू ।

स्वामी वासुदेवराया ।

सतत मी शरण तुझे पाया ।

वासुदेव करी आरती ।

दिधली सद्गुरूने स्फूर्ती ॥

---

## चाल

स्वामी सद्गुरूरायाची ।

करिता आरती, दूर्दिन जाती, सुदिन भासती, पहा प्रचीती ।

सत्ता सर्व ही सद्गुरूंची ।

असे ही कामधेनू आमुची ॥३ ॥